निम -शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्यामध्ये (Peri Urban) लगतच्या शहरी निकषानुसार पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र. १३०(II)/ पापु-०७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ७ जून, २०१२

**वाचा:-** १)शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.पापुयो-१०९५/१६८९/१६९/नवि-२८, दि.३० नोव्हेंबर,१९९५

२) शासन निर्णय पापुवस्ववि क्र.ग्रापापु -१०९९/प्र.क्र.३२८/ पापु-०७, दि.२७ जुलै, २०००

३) शासन निर्णय पापुवस्ववि क्रनापापु -१०००/प्र.क्र. ४१९ / पापु-२२, दि.२७ सप्टेंबर,२०००

४)केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना (NRDWP Guidelines)

५) शासन निर्णय,पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७ .दि.१७ मार्च,२०१०

प्रस्तावना :

राज्यातील ग्रामीण भागातील नागरीकांना पिण्याचे सुरक्षित व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दि.२७ जुलै,२००० च्या शासन निर्णय.क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/ पापु-७ नुसार मागणी आधारीत धोरणे अवलंबिले आहे. या धोरणानुसार ग्रामीण भागात दरडोई दर दिवशी ४० लिटर्स पिण्याचे पाणी पुरवावयाचे आहे. संदर्भ क्र.५ येथिल शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. नागरी भागात पिण्याचे सुरक्षित व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाच्या निकषानुसार मलनि:सारण योजना असलेल्या शहरात १३५ लिटर्स दरडोई दर दिवशी तर मलनि:सारण योजना नसलेल्या शहरात ७० लिटर्स दरडोई दर दिवशी आणि महानगर शहरांमध्ये १५० लिटर्स दरडोई दर दिवशी नुसार पिण्याचा पाणी पुरवठा करण्याचे धोरण स्विकारण्यात आलेले आहे.

३. महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यातील ४२ टक्केपेक्षा अधिक नागरीक शहरी भागात वास्तव्य करीत आहेत. ही टक्केवारी केवळ घोषित केलेल्या नागरी संस्थामध्ये वास्तव्य करणा-या नागरीकांची आहे. या शिवाय शहरालगतच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात ग्रामपंचायती /वाडया /वस्त्यामध्ये नागरीक वास्तव्यास आहेत, तो भाग नागरी म्हणून गणला जात नाही. साधारणत: असा भाग निम- शहरी (Peri Urban) म्हणून गणला जातो. निम- शहरी भागाचे वैशिष्ट म्हणजे हा भाग शहरालगतचा असल्यामुळे या भागाचे सातत्याने शहरीकरण

तसेच लोकसंख्यावाढ होत असते आणि त्यामुळे येथील जनतेला शहराप्रमाणे वाढीव दर्जाच्या सेवांची गरज भासू लागते. ही बाब विचारात घेऊन शासनाच्या नगर विकास विभागाच्या दि.३० नोव्हेंबर, १९९५ च्या शासन निर्णय क्र.पापुयो-१०९५/१६८९/प्रक्र.१६९/न.वि-२८ नुसार महानगरपालिका /नगरपरिषदा यांच्या हद्दीला लागून असलेल्या ५ किलो मीटरपर्यंतच्या ग्रामीण क्षेत्रात नागरी पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. तथापि, त्यासाठी अतिरिक्त पिण्याचे पाणी संबंधित महानगरपालिका /नगरपरिषदेने मंजूर करुन घ्यावयाचे आहे. मात्र, संबंधित क्षेत्रामध्ये राहणा-या नागरीकांना शहरी भागाप्रमाणे पाणीपट्टी व इतर अटी लागू राहतील अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

४. निम- शहरी भागांसाठी पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे नसल्यामुळे अशा भागात वाढीव पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करणे शक्य होत नाही. त्याअनुषगांने निम- शहरी भागांकरीता वाढीव पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करता याव्यात म्हणून मार्गदर्शक तत्वे विहित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

राज्यातील शहरांच्या लगत असलेल्या निम-शहरी (Peri Urban) ग्रामपंचायती /वाडया /वस्त्यांना लगतच्या शहरी निकषानुसार वाढीव पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करण्यासाठी निम-शहरी पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यास आणि त्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे विहित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. निम-शहरी भागाची व्याख्या व निम-शहरी भाग ठरविण्याच्या मार्गदर्शक सूचना सोबतच्या जोडपत्र अ प्रमाणे राहतील.

२. निम -शहरी भागातील लगतच्या शहरात ज्या निकषानुसार पाणी पुरवठा करण्यात येत असेल त्याचप्रमाणे निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्याकरीता वाढीव पाणी पुरवठा व्यवस्था निर्माण करण्यात यावी. यासाठी निम- शहरी भागांना शहरी निकषानुसार वाढीव पाणी पुरवठयाची कामे घेण्यासंदर्भात पात्र ठरण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रथम पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात प्राथमिक सुधारणांची (Reforms) अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्यामध्ये लगतच्या शहरी निकषानुसार वाढीव पाणी पुरवठयासाठी दोन टप्यात कामे घेण्यात येतील. त्यानुसार पहिल्या टप्यात प्राथमिक सुधारणांची (Reforms) कामे पुर्ण करणे तर दुस-या टप्यात सुधारणाच्या कामानुसार शहरी निकषाप्रमाणे वाढीव पाणी पुरवठयाची कामे घेणे आवश्यक राहील. प्राथमिक सुधारणांच्या आधारे निम-शहरी भागामध्ये लगतच्या शहरी निकषाप्रमाणे पाणी पुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी सविस्तर प्रकल्प प्रस्ताव (DPR) तयार करण्यात यावा.

३. निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात घ्यावयाच्या प्राथमिक सुधारणांच्या कामामध्ये ग्राहक सर्वेक्षण, जीआयएस मॅपिंग, हायड्रॉलिक मॉडेलिंग, पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरिक्षण,

बल्क मिटर्स बसविणे,औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना मिटर्स बसविणे, संगणकीय बिलिंग व वसूली पद्धत, ग्राहक तक्रार निवारण ,शहर स्वच्छता आराखडा तयार करणे इत्यादी कामे ' **जोडपत्र — ब**' नुसार प्रथम घ्यावी लागतील.

४. निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्यामध्ये प्राथमिक सुधारणा व सविस्तर प्रकल्प प्रस्तावाच्या आधारे वाढीव पाणी पुरवठ्यासाठी खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून (NRDWP) करण्यात यावा.

५. सोबतच्या '**जोडपत्र अ**' मधील मार्गदर्शक सूचनांनुसार शहरा लगतच्या ग्राम पंचायती /वाड्या /वस्त्या या पाणी पुरवठ्याच्या दृष्टिकोणातून निम- शहरी म्हणून निश्चित करण्यासाठी तसेच त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १) जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद | सह अध्यक्ष |
| ३) संबंधित आयुक्त, महानगरपालिका/संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद | सदस्य |
| ४) जिल्हा अधिक्षक,भूमी अभिलेख | सदस्य |
| ५) सहायक/उप संचालक,नगर रचना | सदस्य |
| ६) कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. | सदस्य |
| ७) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू.स.वि.य. | सदस्य |
| ८) संबंधित कार्यकारी अभियंता (जलसंपदा विभाग) | सदस्य |
| ९) संबंधित कार्यकारी अभियंता, (ग्रामीण पाणी पुरवठा) जिल्हापरिषद | सदस्य सचिव |

सदर समितीचे अध्यक्ष उपरोक्त सदस्यांखेरीज समितीच्या बैठकीस आवश्यकता भासल्यास संबंधित विषयातील तज्ञ व्यक्ती/अधिकारी यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करु शकतील.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सोबतच्या '**जोडपत्र अ**' मधील मार्गदर्शक सूचनांनुसार प्रथम जिल्हयातील संभाव्य निम- शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्तीची यादी तयार करुन सदर यादीस व प्राधान्यक्रमास जिल्हाधिकारी समितीची मान्यता घ्यावी. त्याआधारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्या यांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) कृती आराखडयामध्ये समावेश करावा. त्याची सुरुवात सन २०१२-१३ च्या वार्षिक कृती आराखडयामध्ये पात्र निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्त्याचा समावेश करुन करावी. पात्र निम-शहरी ग्रामपंचायती /वाडया /वस्तीच्या प्राथमिक सुधारणांच्या (Reforms) प्रस्तावांना कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी तांत्रिक मंजूरी देवून संबंधित निम-शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अनुज्ञेय अनुदानाच्या ५० % अनुदानाचा हप्ता वितरीत करावा. पहिल्या हप्त्यापैकी ८०% रक्कम खर्च झाल्याचे उपयोगिता

प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर ५० % अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करावा. पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात घ्यावयाच्या प्राथमिक सुधारणांच्या (Reforms) या कामांसाठी निम-शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेस १०० % अनुदान अनुज्ञेय राहील

७. पात्र निम-शहरी भागातील ग्रामपंचायती /वाडया /वस्त्या यांनी प्राथमिक सुधारणांच्या (Reforms) आधारे निम-शहरी भागामध्ये लगतच्या शहरी निकषाप्रमाणे वाढीव पाणी पुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी सविस्तर प्रकल्प प्रस्तावाच्या (DPR) आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करतांना खालील बाबी प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक राहील-

(अ) वाढीव पाणी पुरवठा मागणीच्या प्रस्तावासंदर्भात ग्रामसभेचा ठराव.

(ब) **जोडपत्र ब** मधील स्तर- १ ची कामे पुर्ण केल्याचे आणि **जोडपत्र क** मधील स्तर- २ च्या सुधारणा करण्यास व लगतच्या शहरी निकषानुसार वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी लोकवर्गणी भरण्यास तयार असल्याबाबतचा ग्रामसभेचा ठराव.

(क) प्राथमिक सुधारणांच्या (Reforms) आधारे लगतच्या शहरी निकषाप्रमाणे पाणी पुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प प्रस्तावाची (DPR) संक्षिप्त तांत्रिक व आर्थिक बाबीसंदर्भातील माहिती. त्यामध्ये वाढीव पिण्याच्या पाण्यासाठी प्रस्तावित पाण्याचा स्त्रोत व उपलब्ध पाणी ,लगतची स्थानिक स्वराज्य संस्था/म.जी.प्रा. किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यापैकी ज्यांच्या मार्फत ठोक पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव आहे, त्याचे विवेचन.

८. निम-शहरी भागातील ग्राम पंचायती /वाड्या /वस्त्या यांच्याकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यास तांत्रिक मान्यता देण्याची प्रक्रिया, दि.१७ मार्च,२०१० च्या शासन निर्णयातील परि.क्र.३ नुसार करण्यात यावी. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१००३१७१५३८२१००१ असा आहे. रु.५.०० कोटी पर्यंतच्या योजनांना संबधित ग्रामसभांनी व त्यावरील खर्चाच्या योजनांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. योजनेची अंमलबजावणी ही संबंधित निम-शहरी ग्रामपंचायतीअंतर्गत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीद्वारे करण्यात यावी. एक किंवा त्यापेक्षा अधिक निम-शहरी ग्रामपंचायतींना मिळून सामुदायिक वाढीव पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी करावयाची असल्यास, अशा ग्रामपंचायती शिखर समिती स्थापन करून अंमलबजावणी करु शकतील. रु.३ कोटी पर्यंतच्या प्रादेशिक योजनांना जिल्हा परिषदेच्या जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने तर रु.३ कोटी पेक्षाअधिक किंमतीच्या योजनांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

९.	परिच्छेद ३ मध्ये नमूद पहिल्या टप्प्यातील प्राथमिक सुधारणांची कामे या क्षेत्रातील अनुभवी तांत्रिक संस्थांकडून प्रचलित शासन नियमानुसार करावीत. तर प्राथमिक सुधारणांच्या आधारे वाढीव पाणी पुरवठ्याची कामे प्रचलित कार्यपद्धतीनुसार तसेच ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन करण्यात यावीत.

१०.	निम- शहरी ग्रामपंचायती/ वाडया/ वस्त्यांमध्ये वाढीव पाणी पुरवठयाची कामे घेण्यासाठी शासन अनुदान वितरीत करण्याची व लोकसहभागाची रक्कम भरण्याची कार्यपद्धती शासन शुद्धिपत्रक क्र.ग्रापाधो-११०९/ प्र.क्र.१०४ (अ)/ पापु-०७ ,दि.३१ जानेवारी, २०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०१३११६१०५९००१ असा आहे.

११.	निम -शहरी ग्रामपंचायती/ वाडया/ वस्त्यांमध्ये प्राथमिक सुधारणा आणि शहरी निकषानुसार वाढीव पाणी पुरवठयाच्या कामाचे राज्यस्तरावर संनियंत्रण व समन्वय पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) यांच्यामार्फत करण्यात येईल. या बाबतची ऑनलाईन माहिती व्यवस्थापन यंत्रणा तयार करुन पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने मासिक अहवाल शासनास सादर करावा.

१२.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०६०७१३०१५२१६०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य मंत्री, महाराष्ट राज्य ,यांचे प्रधान सचिव
२. मा.उप मुख्य मंत्री, महाराष्ट राज्य ,यांचे सचिव
३. मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्य मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
७. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
११. संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.

जोडपत्र अ

## निम-शहरी भागाची व्याख्या व मार्गदर्शक सूचना

(शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-१११९/प्र.क्र. १३० पापु-०७, दि.७ जून, २०१२ चे सहपत्र)

**१. निम शहरी भागाची व्याख्या :-**

निम शहरी भाग म्हणजे शहरालगतच्या अशा ग्रामपंचायती/ वाडया/ वस्त्या की जेथील लोकसंख्या दाट असून ती वाढतच जाण्याची शक्यता आहे आणि सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरांमुळे तेथील नागरिक आहे त्या परिस्थितीत उत्तम व्यवस्थापनाच्या माध्यमातून शाश्वत अशा वाढीव पाणी पुरवठा सेवांची मागणी करीत आहे.

**२. निम-शहरी भाग निश्चित करण्याच्या मार्गदर्शक सूचना** - एखादा भाग हा निम शहरी आहे किंवा कसे हे निश्चित करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लगतच्या ग्रामीण भागाील ग्रामपंचायती /वाडया/ वस्त्यांसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे :

(अ) घनता (लगतच्या शहरातील लोकसंख्येच्या घनतेच्या ६० टक्के)

(ब) अंतर - १) नगर पालिकेच्या सीमारेषेपासून ५ कि.मी.च्या परिघातील

२) महानगरपालिकांच्या सीमारेषांपासून १० कि.मी.च्या परिघातील

(क) ग्रामपंचायती/ वाडया/ वस्त्या मधील ६० टक्के वयस्क नागरीक(१८ वर्षावरील) अकृषी उद्योगात (Non- Agricultural Activities) काम करणारे असावेत.

(ड) ग्रामपंचायती /वाडया/ वस्त्यांमधील लोकसंख्या वाढीचा दर हा शहरातील त्यांना लगत असलेल्या वार्डातील लोकसंख्यावाढी एवढा किंवा त्यापेक्षा अधिक

---

जोडपत्र - ब

## प्राथमिक सुधारणा टप्पा-१ मध्ये पूर्ण करावयाची कामे

(शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र. १३० पापु-०७, दि.७ जून, २०१२ चे सहपत्र)

| अ.क्र | प्राथमिक सुधारणा | संनियंत्र आणि मुल्यांकनासाठी कामगिरी निर्देशांक |
|---|---|---|
| १ | ग्राहक सर्वेक्षण | • १०० टक्के घरांचे सर्वेक्षण करणे.<br>१.अनधिकृत नळ जोडण्यांची संख्या निश्चित करुन त्यांचे अधिकृत नळजोडणीत रुपांतर करणे<br>२.सर्व सार्वजनिक नळ जोडण्याचे रुपांतर गट/वैऽयक्तिक नळ जोडणीत रुपांतर करणे<br>३.प्रत्येक घराबाबत संगणकीय डेटा तयार करणे व तो अद्यावत ठेवणे. |
| २. | ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे | • ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे |
| ३. | सर्व औद्योगिक व वाणिज्यक ग्राहकांना मीटर बसविणे | • १०० टक्के औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना मीटर बसविणे(Bulk Metering)<br>• पाणी पुरवठा व्यवस्थेवर बल्क मिटर्स बसविणे. |
| ५ | जी.आय.एस.मॅपींग | • पाणी पुरवठा योजनांच्या वितरण व्यवस्थेतबाबत (net work) माहिती जी.आय.एस वर संकलित करणे. |
| ६ | पाणी व ऊर्जा लेखापरिक्षण | • पाणी लेखापरिक्षणपूर्ण करणे.<br>• पाणी गळतीचे प्रमाण (NRW) निश्चित करणे.<br>• योजनेच्या पुनर्वसनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे.<br>• योजनेचे उर्जा लेखापरीक्षण करणे व पुनर्वसनासाठी कामे निश्चित करणे. |
| ७ | वित्तीय व्यवस्थापन | • संगणकीय देयके वाटपाची पध्दत स्थापित करणे.<br>• १०० टक्के देयके वाटप करणे व किमान ८० टक्के वसुली करणे.<br>• देखभाल दुरुस्ती खर्चाची ८०-९० टक्के वसुली साध्य करणे<br>• पाणीपट्टी दर सुधारित करणे. |
| ९ | सांडपाणी /दुषित झालेल्या पाण्याच्या स्त्रोताचे मोजमाप | • दुषित असलेल्या सर्व स्त्रोतांची संख्या निश्चित करणे. |
| ४ | स्वच्छता<br>स्वच्छता आराखडा तयार करणे | • आहे त्या जागी (on-site)मैला-सांडपाणी यांचा व्यवस्थापन अभ्यास पूर्ण करणे.<br>• आहे त्या जागी (on site) मैला-सांडपाणी यांच्या सुयोग्य व्यवस्थापनाबाबत आराखडा तयार करणे.<br>• प्रत्येक घरांचे सर्वेक्षण पूर्ण करुन शासनाच्या घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन धोरणानुसार स्वच्छता आराखडा तयार करणे. |

जोडपत्र क (सुधारणा टप्पा २)

**प्राथमिक सुधारणांच्या आधारे पाणी पुरवठा व स्वच्छता व्यवस्थेमध्ये घ्यावयाची**
**भांडवली कामे तसेच त्याअनुषगाने करावयाच्या विविध सुधारणांचे विवरण**
(शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र. १३० पापु-०७, दि. ७ जून, २०१२ चे सहपत्र)

| अ.क्र | मुलभूत सुधारणा | संनियंत्रण आणि मुल्यांकनासाठी कामगिरी निर्देशांक |
|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणे | • पाणी लेखापरीक्षण अहवालानुसार योजनेचे पुनर्वसन करणे<br>• हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण (NRW) १५% पर्यंत कमी करणे.<br>• सर्वांना वैयक्तिक नळ जोडणी आणि आवश्यक तेथे गट नळजोडणी देणे.<br>• पुरेशा दाबाने समन्यायीक व गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे.<br>• १००% घरांना जलमापके बसविणे<br>• योजनेच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी खाजगी संस्थांच्या सहभाग घेणे<br>• ऊर्जा लेखा परिक्षण अहवालानुसार पुनर्वसन कामे करणे.<br>• उर्जा खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना करणे. |
| २. | सांडपाणी / मलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा | • भुमिगत गटारामार्फत किंवा कमी खर्चाच्या पध्दतीच्या गटारातून सांडपाणी वाहून नेणे, प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट व्यवस्था निर्माण करणे.<br>• उघडया गटारात मैला मिश्रीत पाणी सोडण्याचे प्रमाण कमी करणे.<br>• दुषित पाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्वापर करणे.<br>• सांडपाणी व्यवस्थापनाच्या देखभाल दुरुस्तीमध्ये कार्यक्षमता आणण्यासाठी खाजगी संस्थांचा सहभाग घेणे.<br>• पाण्याच्या स्त्रोतात सोडल्या जाणा-या सांडपाण्याचे विहित कालावधीच्या अंतराने नमुने संकलित करुन त्याचा BOD स्तर तपासून हे सांडपाणी नमुने विहित निकषानुसार आहेत हे साध्य करणे. |
| ३. | शौचालयाची व्याप्ती वाढविणे | • बंद /नादुरुस्त शौचालयांची संख्या निश्चित करुन त्यांची दुरुस्तर करुन ती वापरात आणणे. सामुहिक शौचालयांची आवश्यकता असलेल्या जागा निश्चित करुन सामुहिक शौचालये बांधणे.<br>• सेप्टीक टँकमधून मैला बाहेर काढून त्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे<br>• पर्याप्त वैयक्तिक शौचालये व सार्वजनिक शौचालये बांधून सुयोग्य गटार व्यवस्थेस जोडणे. |
| ४. | घनकचरा व्यवस्थापन आराखडा तयार करणे. | • प्रत्येक घरातून कचरा संकलित करणे, विघटीत होणार कचरा (ओला) व अविघटीत कचरा (सुका) वेगवेगळा करुन संकलित करणे व वाहून नेण्याचे ध्येय साध्य करणे.<br>• घनकचरा प्रक्रिया व्यवस्था स्थापित करणे.<br>शास्त्रीय भूमी भराव विकसित करणे. |

| | | |
|---|---|---|
| ५. | आर्थिक व्यवस्थापन सुधारणा | • देखभाल दुरुस्ती खर्च १०० टक्के खर्च भरुन निघेल अशा रितीने पाण्याचे दर निश्चित करुन योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे.<br>• सुयोग्य स्वच्छता कर लागू करुन खर्चाची वसुली करणे.<br>• पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांची कार्यक्षम बिलींग आणि वसुली यंत्रणा स्थापित करणे. |
| ५. | **नीम शहरी स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था** | • नीम शहरी स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांकरिता सुयोग्य संस्था स्थापित करणे |
| ६. | **माहिती संनियंत्रण पध्दत स्थापित करणे** | • परिणामकारक संनियंत्रणासाठी व निर्णय घेण्यास सहाय्यभूत अशी माहिती संनियंत्रण पध्दत स्थापित करण्यात यावी. |
| ७. | **विहीत सेवा निर्देशांक आणि पाणी दराबाबतचे मार्गदर्शक तत्वे स्विकारणे.** | • शासनाने विहित केलेली सेवा दर्जा निर्देशांक आणि पाणी दाराबाबतचे मार्गदर्शक तत्वे स्विकारुन त्यांची अंमलबजावणी करणे.<br>• प्रत्येक वर्षी पुरविण्यात येणा-या सेवा दर्जा निर्देशकांची पूर्ण निश्चिती करुन त्याची माहिती सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देणे. |
| ८ | **पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांसाठी स्वतंत्र लेखे ठेवणे.** | • पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक ठेवणे.<br>• पाणी पुरवठा आणि स्वच्छता यासाठी दोन स्वतंत्र लेखे ठेवणे |
| ९. | इतर सुधारणा<br>**ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे** | • मजबूत आणि परिणामकारक अशी ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे की ज्यायोगे किमान ८० टक्के तक्रारीचे निवारण २४ तासात होऊ शकेल. |
| १०. | **२४ X ७ पथदर्शी सेवांकरिता करार** | • प्रायोगिक तत्वावर निम-शहरी ग्रामपंचातीमधील एका भागामध्ये २४ X ७ तत्वावर पाणी पुरवठ्याची अंमलबजावणी करणे. |
| ११. | **क्षमता बांधणी आराखडा** | • क्षमता बांधणी आराखडा व तांत्रिक सहाय कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे. |
| १२. | **पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे.** | • पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा विषयी नागरिकांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाच्या माहितीचे सेवा निर्देशांक निश्चित करणे.<br>• निश्चित केलेल्या सेवा निर्देशांकाप्रमाणे उपलब्ध केलेल्या सेवांची माहिती नागरीकांना देणे. |

| | | |
|---|---|---|
| ५. | आर्थिक व्यवस्थापन सुधारणा | • देखभाल दुरुस्ती खर्च १०० टक्के खर्च भरुन निघेल अशा रितीने पाण्याचे दर निश्चित करुन योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे.<br>• सुयोग्य स्वच्छता कर लागू करुन खर्चाची वसुली करणे.<br>• पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांची कार्यक्षम बिलींग आणि वसुली यंत्रणा स्थापित करणे. |
| ५. | नीम शहरी स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था | • नीम शहरी स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांकरिता सुयोग्य संस्था स्थापित करणे |
| ६. | माहिती संनियंत्रण पध्दत स्थापित करणे | • परिणामकारक संनियंत्रणासाठी व निर्णय घेण्यास सहाय्यभूत अशी माहिती संनियंत्रण पध्दत स्थापित करण्यात यावी. |
| ७. | विहीत सेवा, निर्देशांक आणि पाणी दराबाबतचे मार्गदर्शक तत्वे स्विकारणे. | • शासनाने विहित केलेली सेवा दर्जा निर्देशांक आणि पाणी दाराबाबतचे मार्गदर्शक तत्वे स्विकारुन त्यांची अंमलबजावणी करणे.<br>• प्रत्येक वर्षी पुरविण्यात येणा-या सेवा दर्जा निर्देशकांची पूर्ण निश्चिती करुन त्याची माहिती सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देणे. |
| ८ | पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांसाठी स्वतंत्र लेखे ठेवणे. | • पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक ठेवणे.<br>• पाणी पुरवठा आणि स्वच्छता यासाठी दोन स्वतंत्र लेखे ठेवणे |
| ९. | इतर सुधारणा ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे | • मजबूत आणि परिणामकारक अशी ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे की ज्यायोगे किमान ८० टक्के तक्रारीचे निवारण २४ तासात होऊ शकेल. |
| १०. | २४ X ७ पथदर्शी सेवांकरिता करार | • प्रायोगिक तत्वावर निम-शहरी ग्रामपंचातीमधील एका भागामध्ये २४ X ७ तत्वावर पाणी पुरवठ्याची अंमलबजावणी करणे. |
| ११. | क्षमता बांधणी आराखडा | • क्षमता बांधणी आराखडा व तांत्रिक सहाय कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे. |
| १२. | पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे. | • पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा विषयी नागरिकांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाच्या माहितीचे सेवा निर्देशांक निश्चित करणे.<br>• निश्चित केलेल्या सेवा निर्देशांकाप्रमाणे उपलब्ध केलेल्या सेवांची माहिती नागरीकांना देणे. |

-----------------------------------------